N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर    **P.S.(ठाणे):** लोहगांव पोलीस स्टेशन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0050    **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 02/05/2026 01:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 30/04/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 01/05/2026
**Time From (वेळेपासून):** 19:18 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 01/05/2026    **Time (वेळ):** 23:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 02/05/2026 01:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** लोहगाव पोलीस स्टेशन पुणेशहर येथील डीबी रुम येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री सुहास गणेशराव हट्टेकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,लोहगांव पोलीस स्टेशन, पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे,लोहगांव पोलीस स्टेशन, पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9881873330

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री मनोज मधुकर बरुरे | | | 1. 601,गंगा कलश सोसायटी, कळस धानोरी पुणे-16,लोहगांव पोलीस स्टेशन,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद तारीख 02/05/2026

मी सुहास गणेशराव हट्टेकर, वय- 37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9881873330

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 30/04/2026 रोजी 13.00 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.सतिश वाळके, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार शुभम सुखदेव सोनवणे वय वर्षे 30, व्यवसाय, रा. संजय पार्क एअर पोर्ट रोड लोहगाव पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले.व सदर कारवाई करीता वनक्षेत्रकार्यालय व आरटीओ पिंपरी चिंचवड यां कार्यालयातील पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. आम्हीतक्रारदार यांनाआमचे कक्षात घेवुन जावुन त्यांची तक्रार ऐकुन घेतली. त्यांनतर 13.40वा चे सुमारास पंच लाप्रवि कार्यालयात आमचे कक्षात आले,त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे पंच 1) आदित्य जगदीश औचारे, वय 32 वर्षे, पद- लिपीक नेमणुक वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय वेल्हे रा.सर्वे नं 31/4 रोड नं 14,चौधरी नगर धानोरी पुणे 15 मो न 7741927772पंच 2) शिल्पा ज्ञानेश्वर लिंमकर वय 40 वर्ष, कनिष्ठ लिपीक प्रादशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड रा ई /301 तनिष्क होम सोसायटी, दत्तनगर पुणे आळंदी रोड दिघी मो न.9860624626. असे सांगितले.त्यांची तक्रारदार शुभम सोनवणे व सापळा पथकातील अंमलदार पोहवा/3296 गदादे,पोशि/9843 महामुलकर चालक पोहवा /काकडे,यांचेशी ओळख करून दिली. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार तोंडी सांगितली.तसेच स्वहस्ताक्षरात लिहून दिली.ती थोडक्यात पुढीलप्रमाणे,

तक्रारदार यांचा कलवड वस्ती लोहगांव येथे 3000 स्के.फुटचा प्लॅाट असून तक्रारदार यांचे वहिवाटीच्या रस्त्यामध्ये गुड्डम खान यांनी कब्जा केला होता. त्यावरुन त्यांचेमध्ये वाद आहेत.सदर प्रकरणात लोहगाव पोलीस स्टेशन येथे एन सी दाखल आहेत.सदर एन सी चे अनुषंगाने लोकसेवक पीएसआय बरूरे यांनी तक्रारदार यांना दिंनाक 28/04/2026 रोजी लोहगाव पोलीस स्टेशन येथे बोलावुन सांगितले कि, तक्रारदार यांचेविरूदध दाखल एन सी मध्ये गुन्हा दाखल करता एन सी दाखल केली आहे. तसेच भविष्यातदेखील गुन्हा दाखल न करता मदत करण्याकरीता स्वत व वरिष्ठाकरिता 70,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे.

तरी पी एस आय मनोज बरूरे नेमणुक लोहगाव पोलीस स्टेशन यांनी तक्रारदाराकडे मागीतलेल्या लाच रक्कम 70,000/- रुपये देण्याची तक्रारदार यांची ईच्छा नसल्याने लाप्रवि मार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई होण्याकरिता अर्ज केला आहे..

त्यानंतर पंचानी व आम्ही सदर लेखी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या आहेत.सदर तक्रारीचे अनुषंगाने दिंनाक 30/04/2026 रोजी तक्रारदार यांना लोहगाव पोलीस स्टेशन येथे बोलावले असलेने पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर मी,तक्रारदार व पंचास शासकीय सोनी कंपनीचा व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष त्याची पाहणी केली असता, त्यावर बाजुस SanDisk Ultra 32 GB A1 micro SD HC I दुसरे बाजुस 5482XX1410HL BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्डव्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री.शुभम सोनवणे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच निवेदन व सापळा कारवाईचे चित्रीकरण व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये कारण्यात येणार असलेचे सांगुन शासकीय सोनी कंपनीचा व्हिडीओ कॅमेरा दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर SanDisk Ultra 8 GB A1 micro SD HC I व



Scanned with CamScanner

त्याखाली 52010NAZN13Q BH MADE IN TAIWAN असे दुसरे बाजुस MMCB08BFGC-CC MHX XY 21Y07 MADE IN TAIWAN छापलेले असल्याचे दिसुन आले.सदर मेमरी कार्ड व्हिडीओ कॅमेरामध्ये बसविले.व त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची खात्री करून दिली.
त्यानंतर तक्रारदार व पंच यांचे डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये निवेदन घेण्यात आले त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग केले. तेव्हा 14.57 वाजले होते.तक्रारदार व पडताळणी/सापळा पथकास पडताळणी कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या.

त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे लाप्रवि कार्यालयात असलेल्या सरकारी वाहनइरटिगा कार क्रमांक MH12UC4105 हीचेमध्ये सापळा कारवाईकरिता आवश्यक सर्व साहीत्य, प्रिटर, लॅपटॉप काळा कपडा सील साहीत्य ईत्यादी सर्व आवश्यक साहीत्य सरकारी वाहनामध्ये ठेवण्यात आले. पंच, पोहवा/गदादे,पोशि महामुलकर ,चालक पोहवा काकडे असे सरकारी वाहनात बसलो. तक्रारदार हे त्यांचे इनोव्हा कार क्रमांक.MH12KE0073 यामध्ये बसुन आमचे सह लाप्रवि कार्यालयातुन निघाले तेव्हा 15.10 वाजले होते. दोन्ही वाहने साधु वासवानी चौक-येरवाडा मेट्रो स्टेशन कडून विमानतळ रोड लोहगाव कडे जात असताना येरवडा जेल संजय पार्कचे परिसरात अडोशाला थांबलो. आमचे पाठोपाठ तक्रारदारही थांबले. तेथे तक्रारदार यांना सरकारी वाहनामध्ये बसवुन त्यांना व पंचांना पुन्हा एकदा पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने सुचना देण्यात आल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री सोनवणे यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. सोनवणे व पंच क्र. 1 श्री. औचारे यांना तक्रारदार यांचे इनोव्हा कार क्रमांक. MH12KE0073 यामध्ये बसवुन लोकसेवक पीएसआय बरूरे यांचे लोहगाव पोलीस स्टेशन पुणे येथे रवाना केले. ती वेळ 15:36 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक लोहगाव रोड येरवडा जेल परिसरात संजय पार्क जवळ थांबुन राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 सापळा पथक थांबलेले ठिकाणी परत आले तेव्हा त्यांचा रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला तेव्हा 17.00 वाजले होते. तेव्हा तक्रारदार यांना पंच क्र 02 व 01 यांचेसमक्ष रवाना केल्यापासून येईपर्यत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार सोनवणे यांनी सांगितले कि,"मी व पंच क्र.1 असे आम्ही लोकसेवक यांचे लोहगाव पोलीस स्टेशनचे कक्षामध्ये जावुन त्यांची भेट घेवुन तेथे साहेबाचे समोर बसुन बोलत असताना मी लोकसेवक पीएसआस बरुरे यांना "कस करु मग थोडया वेळात येऊ का."असे म्हणालो. त्यावर ते मला"काय स्वत:च्या हातान करायच का.."असे म्हणाले. त्यावर मी पीएसआय बरुरे यांना "नाही तुमच्याकडं..असे म्हणलो. तेव्हा पीएसआय बरुरे मला "कपाटाच कस करतो.."असे म्हणाले.तेव्हा मी त्यांना "त्यातच करा" असे म्हणालो. त्यावर त्यांनी मला "कपाटाला किती लागतील."असे विचारले. तेव्हा मी त्यांना "15 हजार.." असे म्हणालो. त्यावर ते "12 हजार.."असे म्हणाले. तेव्हा मी "इतक" असे म्हणालो. त्यावर पीएसआय बरुरे मला "15 हजार रुपयाला.."असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "साहेब एॆशीच्यावर नको व्हायला पण काय होईल त्याला वेगळ वळण लागेल..तो म्हणत होता...मी नव्हतो हे नव्हते." असे म्हणालो.. त्यावर पीएसआय बरुरे मला "मी नाही म्हणालो.."असे म्हणाले.त्यावरमी त्यांना"यातच करा कापाटाच नको माझ्या.."असे म्हणालो. त्यावर पीएसआय बरुरे मला "सांगीतल ना."असे म्हणाले.त्यानंतर काही वेळ चर्चेनंतर मी पीएसआय बरुरे यांना"सर सांगा ना.. थोड.. अर्ध्या.. पाऊन तासात घेऊन येतो"असे म्हणालो. त्यावर ते मला"अर्ध्या.. पाऊन.. तासात."असे म्हणाले.तेव्हा मी पीएसआय बरुरे यांना"देऊन जातो."असे म्हणालो. तेव्ह पीएसआय बरुरे मला "बाळासाहेब नाराज होतील दुसर.. काय नाय.."असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "हे रोख देतो.."असे म्हणालो.त्यावर त्यांनी मला "8 हजार रुपये धरुन 8 त्रिक 24 किती.."असे विचारले. तेव्हा मी त्यांना "3 नका टाकु" असे म्हणालो. त्यावर त्यांनी मला "किती मग.दोन तीन मग.."असे विचारले.त्यावर मी पीएसआय बरुरे यांना"दोन करा जाऊदया.."असे म्हणालो. त्यावर पीएसआय बरुरे मला "पन्नास .. वीस..आणि ..सोळा."असे म्हणाले. त्यावर मी त्यांना " मदत करायला सांगा.."असे म्हणालो. तेव्हा पीएसआय बरुरे मला "सांगतो..सांगतो.. मॅडमपाशी किती जरी हयांचा विषय गेला.. तरी लय चुकीच्या.. अनुशंगाने.."असे म्हणाले.मग मी व पंच क्रमांक 01 असे तेथुन आपण थांबेलल्या ठिकाणी परत आलो.अशी माहिती तक्रारदार यांनी पचं क्रमांक 2 यांचे समोर सांगितली.
त्यानंतर पंच क्र. 1 श्री.आदित्य औचारे यांना घडलेला घटनाक्रम विचारला असता, त्यांनी ते तक्रारदार यांचे सोबतच होते.व त्यांनी तक्रारदार यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॅ◌ारवर्ड करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली. दरम्यान तक्रारदार यांना लोकसेवक यानी व्हॉटसअप वरु कॉल केला परतु तो कट झालेने तक्रारदार यांनी पीएसआय बरूरे यांना पंचासमक्ष 18.57 वा व्हॉटसअप कॉल करून स्पीकर ऑन करून बोलणी केली असता त्यांनी तक्रारदार यांना लगेच लोहगाव पोलीस स्टेशन येथे बोलावले.



Scanned with CamScanner

त्याप्रमाणे तक्रारदार व पंच 01 यांना पुन्हा पडताळणी करिता पाठविण्याचे ठरले.
तक्रारदार श्री. सोनवणे व पंच क्र. 1 श्री. औचारे यांना सुचना देवुन तक्रारदार यांचे इनोव्हा कार क्रमांक MH12KE0073 यामध्ये बसवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून होल्ड मोड वरू ठेवुन लोकसेवक पीएसआय बरूरे यांचे लोहगाव पोलीस स्टेशन पुणे येथे रवाना केले. ती वेळ 19:18 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक लोहगाव रोड येरवडा जेल परिसरात संजय पार्क जवळ थांबुन राहीलो.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 सापळा पथक थांबलेले ठिकाणी परत आले तेव्हा त्यांचा रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला तेव्हा 20.04 वाजले होते.तेव्हा तक्रारदार यांना पंच क्र 02 व 01 यांचेसमक्ष रवाना केल्यापासून येईपर्यत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार सोनवणे यांनी सांगितले कि,मी व पंच श्री औचारे असे लोहगाव पोलीस स्टेशन येथे जावुन पीएसआय बरुरे‍ साहेबाना भेटून "पन्नासच च झालय, बाकीच खुप होतय ते..मी म्हणलो सत्तर मध्ये करा..तुमी..तुमी सांगा"त्यावर पीएसआय बरुरे यांनी मला"कधी करणार.." असे विचारले.त्यावर तक्रारदार यांनी त्यांना"आता माझ्याकडे ऑनलाईल पन्नास..तरी कॅश कराय सांगीतली बाकीचे.. सगळी."असे म्हणाले. त्यावर पीएसआय बरुरे तक्रारदार यांना म्हणाले कि,"सत्तर करुन टाका.. मग मी बोलतो मॅडमला..". तक्रारदार यांनी" ते बी करतो.. त्याचा विषय नाय पण आता मला जायचय..कन्हेरसर ला."असे म्हणाले. त्यावर पीएसआय बरुरे यांनी तक्रारदार यांना"मग आता काढुन दयायला किती वेळ लागतो.."असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी"मी सांगीतले पाच दहा मिनिटे दया की.."असे म्हणालो. त्यावर पीएसआय बरुरे तक्रारदार यांना म्हणाले कि,"सत्तर करुन टाका.. मग मी बघतो.. मी बाळासाहेबांना त्याच्यातलेच..दहा देतो.. अस करतो..". त्यावर तक्रारदार यांनी पीएसआय बरुरे यांना "नाराजगी नको.."असे म्हणाले. त्यावर पीएसआय बरुरे मला "दोन कपाट करायला पाहीजे होत.. सत्तर केले असत.. पन्नास मॅडमला दिले असते.. राजीखुशी.. वीस मला ठेवले असत..त्याला पंधरा गेले असते.. हे काय ..होत असेल तर .. लिमीटमध्ये असेल तर.."असे म्हणाले.त्यावर तक्रारदार पीएसआय बरुरे यांना "का ?येटी करु..80,000/- करु.."असे विचारले. त्यावर ते मला "आज करुन जावा..परत उद्या परवा.."असे म्हणाले.त्यावर मी त्यांना"तुमी आता आहेत का?.. किती वेळ.."असे विचारले. त्यावर ते मला "आहे ना मी आहे .. मी नाईटलाच ये.." असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "नाईटलाच आहात ना" असे म्हणालो. त्यावर ते मला "पण लवकर दिले तर.. मॅडमला देता येईल ना आताच्या आता.."असे म्हणाले.तक्रारदार व पंच क्रमांक 01 असे तेथुन सापळा पथक थांबेलल्या ठिकाणी परत आले.
त्यानंतर पंच क्र. 1 श्री.आदित्य औचारे यांना घडलेला घटनाक्रम विचारला असता, त्यांनी ते तक्रारदार यांचे सोबतच होते. व त्यांनी तक्रारदार यांचे प्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॅ‍ारवर्ड करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली.व लोकसेवक पीएसआय बरूरे यांनी तक्रारदार यांना स्वत: करिता 80,000/-रूपये लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली असलेचे निष्पन्न झाले.व त्याप्रमाणे पुढील कारवाई 01/05/2026 रोजी करण्याचे ठरविले. सदर झाले कारवाईचा सविस्तर पंचानामा करण्यात आला.

लोकसेवक पीएसआय बरूरे यांनी दिंनाक 01/05/2026 रोजी कार्यालयात येण्याबाबत सांगितलेने सर्व सापळा पथक व पंच असे सर्वजण 14.00 वा लाप्रवि कार्यालयात हजर झालो. तक्रारदार देखील 15.30 वा हजर झाले. त्यांना दिंनाक 01/05/2026 रोजी 80,000/- (ऐंशी हजार) रूपये घेवुन येण्याबाबत सांगितले.त्यावेळी सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार यांनी 80,000/-रूपये (ऐंशी हजार) लाच रक्कम हजर केली. त्यात 500/-रूपये दराच्या 160 नोटा होत्या त्यांचे पंचासमक्ष कागदावर नंबर लिहून कागदावर पंचानी व मी सही केली. सापळा कारवाईचे अनुषंगाने सर्वाना पुन्हा सुचना देवुन दिंनाक 30/04/2026 रे‍ाजीचे सीलबंद मेमरीकार्ड वापरण्यात येणार असलेचे सांगुन एक मेमरीकार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन वाजवुन दाखविले व एक मेमरीकार्ड व्हिडिओ रेकॉर्डर मध्ये टाकले.माझे सुचनेप्रमाणे चालक पोहवा काकडे यांनी कक्षामध्ये तक्रारदार व पंच यांना अ‍ॅथ्रॅसीन पावडरचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करून दाखविले. व सदर नोटांना अ‍ॅथ्रॅसीन पावरडर लावुन लाचेची रक्कम तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे खिशात ठेवली. दरम्यान 17.14 वा तक्रारदार याना लोकसेवकाचा व्हॉटसअप कॉल आला तो पंचासमक्ष उचलुन स्पीकर चालू करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केला.तेव्हा लोकसेवकाने तक्रारदार यांना पोलीस स्टेशन येथे येण्याबाबत सांगितले.
त्यानंतर तक्रारदार व पंच याचे सापळापुर्व निवेदन घेतले. त्याचे पोशि महामुलकर यांनी व्हिडीओ रेकॉर्डिंग केले तेव्हा 17.23वाजले होते.
मी पुन्हा सर्वाना सुचना देवुन पंच क्रमांक 02सापळा पथकातील अंमलदार असे सापळा कारवाईकरिता आवश्यक



Scanned with CamScanner

सर्व साहीत्यासह सरकारी वाहन क्रमांक MH12UC4105 यामध्ये बसलो. तक्रारदार व पंच क्रमांक 01 असे तक्रारदार यांचे इनोव्हा कार MH12KE0073 यामध्ये बसुन लाप्रवि कार्यालयातुन रवाना झालो.तेव्हा 17.33 वाजले होते.दोन्ही वाहने साधु वासवानी चौक-येरवाडा मेट्रो स्टेशन कडून विमानतळ रोड लोहगाव कडे जात असताना येरवडा जेल संजय पार्कचे परिसरात अडोशाला थांबलो. आमचे पाठोपाठ तक्रारदारही थांबले. तेव्हा व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री सोनवणे यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला लावला. तक्रारदार श्री. सोनवणे व पंच क्र. 1 श्री. औचारे यांना तक्रारदार यांचे इनोव्हा कार क्रमांक. MH12KE0073 यामध्ये बसवुन लोकसेवक पीएसआय बरूरे यांचे लोहगाव पोलीस स्टेशन पुणे येथे लाच रक्कम देण्याकरिता रवाना केले. ती वेळ 18.08वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक काही अंतराने त्याचे मागोमाग लोहगाव पोलीस स्टेशनपासुन काही अंतरावर अलीकडे थांबुन गाडीतुन उतरून लोहगाव पोलीस स्टेशनचे परिसरात व बाहेर थांबुन राहीलो.

काही वेळाने तक्रारदार यांनी लोकसेवक पीएसआय बरूरे यांचे कक्षाचे बाहेर येवुन डाव्या हाताने खिशातील रूमाल काढून तोडावर फिरवुन लोकसेवकाने लाच रक्कम स्वीकारले बाबत इशारा केलेने मी तसेच पोहवा/गदादे व पोशि महामुलकर व पंच क्रमांक 02 लागलीच गेलो.तेथे पंच क्रमांक 01 यांनी एक इसमाकडे इशारा करून लोकसेवक पी एस आय मनोज बरूरे असलेचे सांगितले. त्यांना आम्ही जागीच ताब्यात घेतले. तेव्हा पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला तेव्हा 18.47 वाजले होते. पंच क्रमांक 2 देखील आले. त्यावेळी लोकसेवकास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव - श्री मनोज मधुकर बरूरे वय 38 वर्ष पद- पोलीस उप निरीक्षक नेमणुक - लोहगाव पोलीस स्टेशन रा.फ्लॅट नंबर 601,गंगाकलश सोसायटी,कळस धानोरी पुणे असे सांगितले.
पंच क्रमांक 01 श्री औचारे यांना लोकसेवक यांनी लाच रक्कम कोठे ठेवली यांबाबत विचारणा केली असतात्यांनी सांगितले कि, लोकसेवकाने लाच रक्कम त्यांचे पॅन्टचे समोरील बाजुचे डावे खिशात ठेवली आलोसे व आम्ही सापळा पथक असे सर्वजण पोलीस स्टेशनचे डीबी पथकाचे कक्षात जावुन पंचासमक्ष लोकसेवक पी एस आय मनोज बरूरे यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंचासमक्ष त्याचे नेसणीस असलेल्या पॅन्टचे समोरील डावे खिशातुन काढून दिली. त्यामध्ये 500 रूपये दाराच्या एकुण 160 चलनी नोटा 80000/-रुपये दिसुन आल्या.त्या बाहेर काढले असता तेथे कक्षात कृत्रिम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात पाहीले असता नोटांवर अँथ्रसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तसेच लोकसेवक पी एस आय मनोज बरूरे यांचे जीन्स पॅन्टचे डावे बाजुचे समोरील खिशाचे कडावर व मध्ये देखील अँथ्रसीन पावडरची चकाकी दिसुन आली.तसेच तक्रारदार यांचे डावे हाताचे तळावर देखील देखील अँथ्रसीन पावडरची चकाकी दिसुन आली.त्यनंतर पंच क्रमांक 02 यांनी यापुर्वी कागदावर लिहेल्या नोटांचे नंबर व प्रत्यक्ष नोटाचे नंबरची पाहणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. तसेच पंच क्रमांक 02 यांचे हाताची पाहणी केली असता त्याचे हातावर व हातातील नोटांवर अँथ्रसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तक्रारदार यांचे हातावर पॅन्टचे उजव्या खिशाला देखील अँथ्रसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली.
त्यानंतर पंचासमक्ष तक्रारदार यांना रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले कि,ते व पंच पीएसआय बरूटे यांचे कक्षात गेले. परंतु ते चहा घेण्याकरिता बाहेर गेले म्हणुन मी व पंच माझे कारमध्ये जावुन बसलो. नंतर लोकसेवक पीएसआय बरूटे यांनी फोन करून ते आले आहेत व कक्षात या असे सांगितलेने मी व पंच क्रमांक 01 श्री औचारे असे लोहगाव पोलीस स्टेशनचे डीबी कक्षाजवळ गेलो. तेथे पीएसआय बरूरे साहेब बाहेरच थांबले होते. तेथे बाजुलाच आम्हाला झाडाचे बाजूला नेले. तेव्हा मी लोकसेवक बरूटे साहेब यांना "80 चे केलय....नाराज नायना" असे विचारले असता लोकसेवक बरूरे यानी सांगितले कि,"नाराज काय मी मॅडमला देणार 40 यांना देणार 15 आणि यांना" असे सांगितले.तेव्हा पीएसआय बरूरे यांना "मोजुन घ्या पाहीजे तर".असे म्हणालो असता, पीएसआय बरूरे यांनी "काय मोजायचे.. उलट तुम्ही नाराज होयला नाही पाहीजे आमचं काय होय आम्ही इन्वेस्ट केली काय... काय कोन" .असे बोलुन माझेकडून माझे उजवे हातातील 80,000/-रूपये लाच रक्कम घेवुन ती त्याचे डावे हाताने स्वीकारून पॅन्टचे डावे खिशात ठेवली. त्यांनतर मी बाहेर येवुन लाच रक्कम स्वीकारलेबाबत डावा हाताने तोडावर रूमाल फिरवुन पुर्वनियोजितइशारा केला.व तुम्ही पीएसआय बरूरे यांना ताब्यात घेतले.त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 01 यांना देखील विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचेप्रमाणे मिळती जुळती हकीगत सांगितली.त्यानंतर आम्ही पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता तक्रारदार व पंचानी सांगितलेप्रमाणे हकीगत बरोबर आहे.सदर झाले कारवाईचा सविस्तरपणे पंचनामा करण्यात आलेला आहे.व मेमरी कार्डच्या हॅश व्हॅल्यू घेण्यात आल्या आहेत



Scanned with CamScanner

तरी आरोपी लोकसेवक श्री मनोज मधुकर बरूरे वय 38 वर्ष पद-पोलीस उप निरीक्षक नेमणुक - लोहगाव पोलीस स्टेशन रा.फ्लॅट नंबर 601,गंगाकलश सोसायटी,कळस धानोरी पुणे यांनी दिंनाक 30/04/2026 रोजी लोहगाव पोलीस स्टेशन येथे झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार याचेविरूदध दाखल एन सी मध्ये मदत केली. भविष्यात देखील कुठलीही कारवाई न करता मदत करण्याकरिता स्वत करिता वरिंष्ठाचे नावाने 80,000/-रूपये (ऐंशी हजार) लाचेची मागणी केली.व ती रक्कम घेवुन येण्यास सांगुन स्वीकारण्याची तयारी दर्शविली आहे.व दिंनाक 01/05/2026 रोजी सापळा करवाई दरम्यान 80,000/-रूपये (ऐंशी हजार)लाच रक्कम स्वीकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले. श्री मनोज मधुकर बरूरे वय 38 वर्ष पद-पोलीस उप निरीक्षक नेमणुक - लोहगाव पोलीस स्टेशन रा.फ्लॅट नंबर 601,गंगाकलश सोसायटी,कळस धानोरी पुणे यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार याचेविरूदध दाखल एनसी मध्ये मदत केली व भविष्यात मदत करण्याकरिता म्हणुन वरिंष्ठाचे नावाने व स्वत: करिता व 80,000/-रूपये (ऐंशी हजार)लाच रक्कम मागणी करून ती स्वत: स्वीकारली. म्हणुन लोकसेवक श्री मनोज मधुकर बरूरे वय 38 वर्ष पद-पोलीस उप निरीक्षक नेमणुक - लोहगाव पोलीस स्टेशन रा.फ्लॅट नंबर 601,गंगाकलश सोसायटी,कळस धानोरी पुणे याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिंयाद आहे.

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

समक्ष हा फिंयादी जबाब दिला

(पी.एस.बालपांडे)
महीला पोलीस उपनिरीक्षक
लोहगाव पोलीस स्टेशन

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
pallavi sureshrao balpande
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** DGPPSBF9705
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
लोहगाव पोलीस स्टेशन, पुणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Manisha Hemant Pa

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPMBDF8001



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner